रे. दिवाणी मुकदमा क्र. १६३/२०१९ मधील निशाणी क्र. ४७ वरील आदेश

(राजाक्का कणसे,व. वि दत्तात्रय नलवडे, व.)

(CNR No. MHSN130006772019)

१. प्रवादी क्र. ६ यांनी सदरचा अर्ज हा वादींनी केलेला दावा रदद करणेकामी ऑर्डर ७ रुल ११(ड) प्रमाणे सादर केलेला आहे.

२. प्रवादी क्र. ६ यांच्या म्हणण्याप्रमाणे वादी यांनी हा दावा रेदिमुक्र १८२/२०१८ मध्ये झालेला तडजोड हुकूमनामा रदद होवून मिळणेकामी दाखल केलेला आहे. प्रवादी क्र. ६ यांच्या म्हणण्याप्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर २३ रुल ३अ नुसार तडजोड हुकूमनामा बेकायदेशीर आहे या सबबी खाली किंवा इतर कुठल्या कारणास्तव रदद करता येवू शकत नाही. असे असताना वादी यांनी अशी त्यांची दाव्यातील प्रमुख मागणी ठेवून त्याअनुषंगाने इतर मागण्या दाव्याच्या कामी केलेल्या आहेत. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे वादी अथवा ति–हाईत इसम हे रेदिमुक्र १८२/२०१८ च्या कामी कोणत्याही प्रकारे पक्षकार ठरु शकत नव्हते. त्यामुळे त्यांना त्या दाव्यातील हुकूमनामाविषयी कोणतीही दाद मागता येवू शकत नाही किंवा अपील दाखल करता येवू शकत नाही. त्यामुळे त्यांनी सदरचा दावा रदद होणेकामी विनंती केलेली आहे.

३. वादी यांनी त्यांचे म्हणणे नि.५० वर सादर केलेले आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर २३ रुल ३अ ची हरकत या दाव्याला

उपस्थित होवू शकत नाही. वादींनी रेदिमुक्र १८२/२०१८ त्यांच्यावर बंधनकारक नाही असे ठरवून मिळणेविषयी दाद मागीतलेली आहे. त्या तडजोड हुकूमनामामध्ये प्रवादी क्र. ६ यांनी केलेली तडजोड ही अन्यायकारक असलेने वादीना त्यांचा हक्क मागणे आवश्यक असलेने वादींनी दावा केलेला आहे. प्रवादी यांनी सदरचा अर्ज हा वादींना त्रास देणेसाठी दुष्ट हेतूने दाखल केला असलेने तो रदद करणेविषयी विनंती केलेली आहे.

४. प्रवादी क्र. ६ यांचे विद्वान वकील श्री. व्ही.पी. राजेभोसले व वादी यांचे विद्वान वकील श्री. एम. आर. इनामदार यांनी आपला युक्तीवाद सादर केला. दोन्हीही बाजूंचे म्हणणे ऐकलेवर पुढीलप्रमाणे गुण या अर्जाचे कामी काढणेत येतात.

| **अ.क्र.** | **गुण** | **उत्तर** |
|---|---|---|
| १ | प्रवादी क्र. ६ यांनी रेदिमुक्र १८२/२०१८ मध्ये केलेली तडजोड वादी क्र. १ व २ च्या लाभांवर परिणाम करणारी होती काय ? | होय |
| २ | प्रवादी क्र. ६ च्या म्हणण्याप्रमाणे वादीचा दावा ऑर्डर २३ रुल ३ प्रमाणे रदद होणेस पात्र आहे काय ? | नाही |
| ३ | काय हुकूम ? | अंतीम हुकूमाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>गुण क्रमांक १</u>**

५. प्रवादी यांचे विद्वान वकील श्री. व्ही.पी. राजेभोसले यांनी युक्तीवाद सादर

केला की जर दाव्यामध्ये काही त्रुटी कथनांमध्ये राहून गेल्या असतील किंवा दाव्याचे कारण त्याद्वारे स्पष्ट होत नसेल किंवा इतर कारणास्तव दावा चालणेस कायदयाने पात्र नसेलतर न्यायालय असा दावा कधीही रदद करु शकते. तर दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर २३ रुल ३ प्रमाणे जर एखादया दाव्याद्वारे झालेला तडजोडनामा रदद होवून मिळणेविषयी विनंती केली असेल तर अशाप्रकारचा दावासुध्दा रदद होणेस पात्र असतो. प्रवादी यांचे विद्वान वकील यांनी युक्तीवाद सादर केला की वादी क्र. १ व २ हे रेदिमुक्र १८२/२०१८ चे कामी पक्षकार नव्हते. त्या दाव्याच्या कामी ज्या पक्षकारांनी तडजोड केली व जी कायम झाली त्याविषयी आता कोणीही हरकत उपस्थित करु शकत नाही. प्रवादी यांचे विद्वान वकीलांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी क्र. ६ यांच्यावर अन्याय करणेसाठीच वादींनी हा दावा दाखल केलेला आहे. प्रवादी क्र. ६ हे आजारी असलेने दावा प्रलंबित असताना औषध उपचारासाठी त्यांच्या हिश्याची काही मिळकत तबदिल केली. वादी त्याबाबत कोणत्याहीप्रकारे हक्क सांगू शकत नाहीत कारण रेदिमुक्र १८२/२०१८ मधील हुकूमनामाने ती मिळकत प्रवादी क्र. ६ यांना प्राप्त झालेली होती. त्यामुळे वादींचा दावा रदद करणेविषयी त्यांनी विनंती केलेली आहे. वादी यांचे विद्वान वकील श्री. एम. आर. इनामदार यांनी युक्तीवाद सादर केला की वादी क्र. १ व २ हे प्रवादी क्र. ६ यांचे नात्याने पत्नी व मुलगी आहेत. प्रवादी क्र. ६ यांच्या शाखेला जो काही हिस्सा प्राप्त होणार होता तो नैसर्गिकरीत्या वादी क्र. १ व २ यांना प्राप्त होणारा हिस्सा होता. वादी यांना रेदिमुक्र १८२/२०१८ च्या कामी कोणीही विचारात न घेता

तडजोड अस्तीत्वात आणली. वादी यांच्यावर अशाप्रकारे करणेत आलेली तडजोड बंधनकारक नाही. त्यामुळे प्रवादी क्र. ६ यांचा अर्ज रदद करणेविषयी त्यांनी विनंती केलेली आहे.

६. प्रवादी यांचे विद्वान वकील यांनी आपला युक्तीवाद सादर करताना **२०११ व्हॅल्युम १ महाराष्ट्र लॉ जर्नल पान ९३९– कन्हैय्यालाल माधवजी ठक्कर वि श्री. पदमनाभ बिल्डर्स** मधील न्यायनिर्णयाचा आधार घेतलेला आहे. न्यायनियमाप्रमाणे ऑर्डर ७ रुल ११ प्रमाणे "सुनवाई घेत असताना कोणाही व्यक्तीकडून स्वतंत्र पुरावा न घेता दाव्याला कायदयाची बाधा येते काय यासाठी दोन्ही बाजूंनी सादर केलेले कागदपत्र व दाव्यामध्ये केलेले कथन विचारात घेवून आदेश पारीत करायचा असतो." न्यायनिर्णयामध्ये नमूद केलेला न्यायनियम जर पाहिला तर प्रवादींच्या विद्वान वकीलांनी सादर केलेल्या युक्तीवादाप्रमाणे वादी व प्रवादींचे कथन व कागदपत्रांच्या आधारावर सदर अर्जाची सुनावणी घेणेत येत आहे.

७. प्रवादी यांचे विद्वान वकील यांनी त्यानंतर सदर दाव्याचे कामी रेदिमुक्र १८२/२०१८ मधील तडजोड हुकूमनामा रदद करणेविषयी केलेली विनंती कशी बेकायदेशीर आहे हे स्पष्ट करणेसाठी सर्वाच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय सादर केलेला आहे. **ए.आय.आर २०२० सुप्रिम कोर्ट २१११ – त्रीलोकी नाथ सिंग वि अनिरुध्द सिंग** या न्यायनिर्णयाप्रमाणे ऑर्डर ३९ रुल ३ प्रमाणे तडजोड हुकूमनामा तयार झालेवर ति–हाईत इसम तो रदद होवून मिळणेसाठी कोणत्याही प्रकारे स्वतंत्र

दावा करु शकत नाही कारण कायदयाने अशाप्रकारे दावा चालविता येवू शकत नाही. प्रवादी क्र. ३ यांनी सादर केलेला न्यायनियम हा जर पाहिला तर तो या दाव्याचे कामी उपयुक्त आहे असे म्हणता येवू शकत नाही. कारण वादी क्र. १ व २ हे ति-हाईत इसम नसून प्रवादी क्र. ६ यांचे हयात वारस आहेत. प्रवादी क्र. ६ यांनी वादींचे प्रतिनिधी म्हणून केलेली तडजोड त्यांना अमान्य असलेने त्यांनी सदरचा दावा केला असलेने संबंधीत न्यायनिर्णयाच्या कक्षेत ते येत नसलेचे दिसून येते.

८. वादी व प्रवादी यांच्यावतीने सादर केलेला युक्तीवाद जर पाहिला तर वादी क्र. १ व २ यांचा रेदिमुक्र १८२/२०१८ या दाव्याशी संबंध होता हे ऑर्डर १ रुल ८ द्वारे स्पष्ट होते. वादी यांच्यावतीने प्रवादी क्र. ६ यांनी रेदिमुक्र १८२/२०१८ च्या कामी तडजोड केली असलेचे दिसून येते. प्रवादी क्र. ६ यांनी तडजोड करताना ऑर्डर १ रुल ८ सब रुल ४, ५ व ६ प्रमाणे त्यांच्या शाखेला प्राप्त असणारा हिस्सा डावलून तडजोड केली असलेचे दिसून येते. अशी तडजोड करणेपूर्वी न्यायालयाची पूर्व परवानगी त्या दाव्याचे कामी घेतली नसलेचेही हुकूमनामावरुन स्पष्ट होते. तडजोडनामाच्या हुकूमनामामध्ये ऑर्डर २३ रुल १ सब रुल ३ प्रमाणे तडजोड कायम होणेपूर्वी त्यांनी ऑर्डर २३ सब रुल १ प्रमाणे तडजोड करताना कोणतीही कार्यवाही केलेली नाही. वादी क्र. १ व २ हे जरी तडजोडीच्या दिवशी अज्ञान नसलेतरी त्यांच्या शाखेच्यावतीने तडजोड करत असताना नैसर्गिकरीत्या त्यांना प्राप्त होणारा हक्क सोडून देणेपूर्वी न्यायालयापुढे त्यांचे मत विचारणे आवश्यक होते. अशाप्रकारे त्यांच्या मताविषयी माहिती

न घेता व संबंधीत माहिती न्यायालयापासून लपवून ठेवून केलेली तडजोड जर पाहिली तर ती ऑर्डर २३ रुल ३अ प्रमाणे झालेली तडजोड आहे असे म्हणता येवू शकत नाही. त्यामुळे प्रवादी क्र. ६ यांनी केलेली तडजोड ही पूर्वग्रहदुषीत असलेचा तर्क प्राप्त होत असलेने गुण क्रमांक १ चे उत्तर होय म्हणून देणेत येते.

**<u>गुण क्रमांक २</u>**

९. प्रवादी क्र. ६ यांनी वादीचा दावा रदद होणेविषयी विनंती केलेली आहे. त्या अनुषंगाने त्यांनी न्यायनिर्णयही सादर केलेले आहेत. प्रवादी यांनी ज्याप्रकारे आपले म्हणणे मांडलेले आहे त्यावरुन रेदिमुक्र १८२/२०१८ च्या कामी प्रवादी क्र. ६ यांनी घेतलेला अल्प हिस्सा हा कायदेशीर आहे. तर वादी क्र. १ व २ हे त्रयस्थ लोक असलेने त्यांना त्याविषयी कोणत्याही प्रकारची दाद मागता येत नसलेबददल आपला युक्तीवाद सादर केलेला आहे. वादी क्र. १ व २ यांच्याशी प्रवादी क्र. ६ यांचा असणारा नातेसंबंध जर पाहिला तर तो रक्ताचा असलेचे दिसून येतो. रेदिमुक्र १८२/२०१८ चे जर स्वरुप पाहिले तर तो दावा वाटपासाठी केला असलेचे दिसून येते. प्रवादी क्र. ६ त्या दाव्याला स्वतःसाठी व वादी क्र. १ व २ साठी उपस्थित राहून तडजोड करत असलेचेही दिसून येते. वादीचा हक्क नाकारणेपूर्वी प्रवादी क्र. ६ याने वादी क्र. १ व २ हे ति—हाईत इसम आहेत व त्यांना दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा लाभ नव्हता व नाही हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. प्रवादी क्र. ६ यांचेवतीने

सादर केलेला युक्तीवाद हा गळेपडूपणाचा असलेचा तर्क प्राप्त होतो. प्रवादी क्र. ६ यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी स्वीकारलेला अल्प हिस्सा हा दाव्यातील इतर पक्षकारांपेक्षा अधिक मौल्यवान असलेचे त्यांनी म्हटलेले आहे. त्या प्रकारचा कोणताही कागदोपत्री पुरावा प्रवादी क्र. ६ यांनी सादर केलेला नाही. यावरुन प्रवादी क्र. ६ इतर प्रतिवादींशी संगनमत करुन व न्यायालयापुढे वास्तविक परिस्थिती उपस्थित न करता वादींना भविष्यामध्ये आर्थिक नुकसान होणेच्या दृष्टीकोनातून तडजोड अस्तीत्वात आणली असलेचा तर्क प्राप्त होतो. त्यामुळे प्रवादी क्र. ६ यांनी केलेली तडजोड ही ऑर्डर २३ रुल ३ ची पुर्तता करणारी नसलेने ती ऑर्डर २३ रुल ३अ प्रमाणे आहे असे म्हणता येवू शकत नाही. त्यामुळे गुण क्रमांक २ चे उत्तर नाही म्हणून देणेत येते.

१०. प्रवादी क्र. ६ यांनी सदरचा अर्ज हा वादींचा दावा रदद होणेकामी दाखल केलेला आहे. प्रवादी म्हणतात त्याप्रमाणे वादीचा दावा मिळकतीविषयी दाद मागणेचा हक्क नाही. परंतू यासोबतच प्रवादी क्र. ६ त्यांच्याशी असणारे नातेसंबंध मान्य व कबूल करतो. त्यामुळे प्रवादी क्र. ६ हा वादीचा दावा मिळकतीत असणारा हक्क डावलू पहात असलेचे दिसून येते. सदरचा अर्ज करणेसाठी कोणते कारण उदभवले होते असे प्रवादींच्या अर्जावरुन स्पष्ट होत नाही. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येतात.

## आदेश

१. प्रवादी क्र. ६ यांचा अर्ज रदद करणेत येतो.

२. प्रवादी क्र. ६ यांनी प्रत्येक वादीला ३,०००/- रुपये खर्च अदा करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Vijay Ramchandra Gharal
Date: 2021.12.22 12:07:22 +05'30'

कडेगांव (वि.रा. घराळ)

दिनांक – २१/१२/२०२१ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव

I affirm that the contents of this P.D.F file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : M.G. Buchade, (Grade III) |
| Court | : Civil Judge, Jr. Dn.,<br>& J.M.F.C., Kadegaon |
| Date | : 21/12/2021 |
| Order signed by the Presiding Officer on. | : 21/12/2021 |
| Order uploaded on | : 22/12/2021 |